**महाराष्ट्र शासन**

**पोलीस अधीक्षक कार्यालय लोहमार्ग, छत्रपती संभाजीनगर**

दुरध्वनी क्र. : ०२४०-२३९२१०० भारतमाता चौक, पोलीस कॉलनी रोड, डीसीटीसी इमारत, छत्रपती संभाजीनगर४३१००१

Email ID - cybercrime.rly-abad@mahapolice.gov.in

जा.क्र. - / २१९० / २०२४ दिनांक :- १० / ०७/२०२४

# प्रेस नोट

लोहमार्ग छत्रपती संभाजीनगर आस्थापनेवर पोलीस शिपाई भरती सन २०२२-२३ ची प्रक्रिया दि.०८-०७-२०२४ ते ११-०७-२०२४ पावेतो पुरूष उमेदवार यांची तसेच दिनांक १२/०७/२०२४ रोजी महिला उमेदवार यांची कवायत मैदान, राज्य राखीव पोलीस बल गट क्र.१४, सातारा परीसर, छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित करण्यात आलेली आहे.

दिनांक ०८-०७-२०२४ ते १२-०७-२०२४ या कालावधीत वेगवेगळया पदांकरीता इतर घटकात मैदानी चाचणी, तांत्रिक अडचण, परिक्षा व इतर कारणास्तव जे उमेदवार भरती प्रक्रियेत उपस्थित राहु शकले नाहीत, अशा उमेदवारांना वाजवी संधी म्हणुन दिनांक १३-०७-२०२४ रोजी अंतिम तारीख देण्यात येत असुन उमेदवारांनी सकाळी ठिक ०५:०० वाजता आवश्यक त्या सबळ पुराव्यासह पोलीस भरती प्रक्रियेत आपले महाआयटीचे आवेदन अर्ज व आवश्यक कागदपत्राच्या छायांकित प्रतीसह हजर रहावे.

दिनांक **१३-०७-२०२४** ही लोहमार्ग छत्रपती संभाजीनगर जिल्हा पोलीस शिपाई भरती २०२२-२३ ची अंतिम तारीख असुन या तारखेनंतर येणा-या उमेदवारांची विनंती विचारात घेतली जाणार नाही याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी.

**(स्वाती भोर)**
पोलीस अधिक्षक लोहमार्ग
छत्रपती संभाजीनगर